
## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

# पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकरिता वापरलेली कार्यपद्धती

**सन 2025-2026**



## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावना | 1 |
| 2. | प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राची कार्यपद्धती | 2 |
| 3. | शहर आपत्ती व्यवस्थापन समितीची रचना, अधिकार व कर्तव्ये | 3 |
| 4. | शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीची रचना, अधिकार व कर्तव्ये | 9 |
| 5. | अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होणारी संभाव्य ठिकाणे | 15 |
| 6. | पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकरिता वापरलेली कार्यपद्धती | 24 |
| 7. | पर्जन्य जल / पूर नियंत्रण सर्वेक्षण पथकाची स्थापना | 25 |
| 8. | आपत्ती व्यवस्थापन आराखड्याअंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीमार्फत सुचविण्यात आलेले तात्पुरती व कायमस्वरुपी उपाययोजना | 27 |
| 9. | प्रस्तावित पर्जन्यजलवाहिनीची लांबी, रुंदी, उंची ठेवण्याची कार्यपद्धती | 29 |
| 10. | पर्जन्य जल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत **दि. 16/10/2025** रोजीच्या आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीमध्ये **12 नाल्यांच्या** नालानिहाय सविस्तर आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास, सर्व्हेक्षण अहवालास व उपाययोजनांना मंजुरी बाबतची माहिती व **आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीचा इतिवृत्तांत** | -- |
| 11. | पर्जन्य जल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत **दि. 03/11/2025** रोजीच्या आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीमध्ये **13 नाल्यांच्या** नालानिहाय सविस्तर आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास, सर्व्हेक्षण अहवालास व उपाययोजनांना मंजुरी बाबतची माहिती व **आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीचा इतिवृत्तांत** | -- |
| 12. | पर्जन्य जल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत **दि. 10/11/2025** रोजीच्या आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीमध्ये **13 नाल्यांच्या** नालानिहाय सविस्तर आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास, सर्व्हेक्षण अहवालास व उपाययोजनांना मंजुरी बाबतची माहिती व **आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीचा इतिवृत्तांत** | -- |
| 13. | पर्जन्य जल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत **दि. 17/11/2025** रोजीच्या आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीमध्ये **10 नाल्यांच्या** नालानिहाय सविस्तर आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास, सर्व्हेक्षण अहवालास व उपाययोजनांना मंजुरी बाबतची माहिती व **आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीचा इतिवृत्तांत** | -- |
| 14. | पर्जन्य जल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत **दि. 24/11/2025** रोजीच्या आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीमध्ये **12 नाल्यांच्या** नालानिहाय सविस्तर आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास, सर्व्हेक्षण अहवालास व उपाययोजनांना मंजुरी बाबतची माहिती व **आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीचा इतिवृत्तांत** | -- |
| 15. | पर्जन्य जल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत **दि. 01/12/2025** रोजीच्या आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीमध्ये **14 नाल्यांच्या** नालानिहाय सविस्तर आपत्ती व्यवस्थापन आराखड्यास, सर्व्हेक्षण अहवालास व उपाययोजनांना मंजुरी बाबतची माहिती व **आपत्ती व्यवस्थापन समिती आढावा बैठकीचा इतिवृत्तांत** | -- |
| 16. | परिशिष्ट अ : आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत केल्याचे आदेश | -- |
| 17. | परिशिष्ट ब : पर्जन्य जल / पूर नियंत्रण सर्वेक्षण पथकाची स्थापना केल्याचे आदेश | -- |

## 1) प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात सोलापूर शहराकरिता सोलापूर महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आहे. सोलापूर शहर 178.00 चौरस किलोमीटर क्षेत्रावर विस्तारलेला असून शहराची एकूण लोकसंख्या ही 9.53 लाख (2011 च्या जनगणनेनुसार) असून आजमितीस नैसर्गिक वाढ विचारात घेता शहराची एकूण लोकसंख्या ही अंदाजे 12.50 लाख इतकी आहे.

प्रत्येक पावसाळयामध्ये सखल भागात नैसर्गिक नाल्यावर प्रचंड प्रमाणात पाणी जमा होते. सदर पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे व नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण झाल्याने पावसाळी पाणी नाल्यालगतच्या रहिवाशी भागातील घरात घुसून आर्थिक नुकसान होते. सन 2018, 2020 व 2025 यावर्षी पावसाळयामध्ये पावसाचे पाणी साचून आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे तेथील नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत. मागील वर्षाप्रमाणे यापुढे ही आपत्कालीन परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाकरता येत नाही. त्या अनुषंगाने भविष्यात अशी आपत्कालीन परिस्थिती उद् भवू नये याकरिता महानगरपालिकेकडील मा. आयुक्त, मा. सहा. आयुक्त, मा. नगर अभियंता, मा. सार्वजनिक आरोग्य अभियंता, यांची तक्रारदार नागरिक, संबंधित नगरसेवक व महानगरपालिका अधिकारी यांच्या संयुक्त बैठका झाल्या. या बैठकीमध्ये प्रस्तुत ठिकाणी अस्तित्वातील सर्व नाल्यांचे पुनरुज्जीवन करणे, नाल्यांची बांधणी करणे, असलेल्या नाल्यांची खोली, रुंदी व उंची वाढविणे, नाला बळकटीकरण करणे, नाला बांधबंदिस्ती करणे इ. विषयावर चर्चा करून कायमस्वरुपी कार्यवाही करणेबाबत चर्चा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणच्या खुल्या नाल्याचे सर्व्हेक्षण करून शहरातील नाल्यांचे आरेखन करण्याचे नियोजित आहे.

शहरातील लोकवस्ती असलेल्या भागातील पर्जन्यवाहिनी व इतर बाबींचा विचार करून संपूर्ण शहरासाठी नाला बांधणी करणे, असलेल्या नाल्यांची उंची वाढविणे, पर्जन्य जलवाहिनी टाकणे इ. चे काम टप्प्याटप्प्याने करण्याचे नियोजन आहे. ज्या भागात पाणी साचून दुर्घटना होण्याची अथवा नागरिकांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे अशा पहिल्या टप्प्यातील प्राधान्यक्रमानुसार नाल्यांचे शास्त्रोक्त पद्धतीने सर्व्हेक्षण करण्यात आले.

शहरातील एकूण 74 नाल्यांची एकूण लांबी 115.77 कि.मी. इतकी असून पर्जन्यवाहिनी वाहून नेण्याकरिता ट्रेनिंग करणे, बंदिस्त करणे, पाईप घालणे इ. कामाचा समाविष्ट आहे. सदर पर्जन्य जलवाहिंनी ही पावसाळ्याचे 4 महिने पाणी वाहून नेणे या कामासाठी बांधली जातात. परंतु शहरात सद्यस्थितीत सदर पर्जन्य जलवाहिनीमध्ये ड्रेनेजचे पाणी मिसळून ते 12 महिने वाहतात. पर्जन्य वाहिनीमध्ये ड्रेनेजचे पाणी मिसळणे हे अपायकारक व नियमाविरुद्ध आहे. तसेच पावसाळयामध्ये सद्यस्थितीतील नाले ओव्हरफ्लो होऊन सखल भागात पाणी साचणे व आजूबाजूच्या लोकवस्तीत व झोपडपट्टीमध्ये पाणी घुसणे इ. प्रकार घडतात. तसेच सोलापूर शहारामध्ये विविध भागात नागरिकांनी आपल्या सोयीसाठी नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहांमध्ये विविध प्रकारचे स्ट्रक्चर्स जसे कि, अनधिकृत इमारत, दुकान, रॅम्प, संरक्षण भिंत, भराव, इ. अडथळ्यामुळे पावसाळी पाणी नाल्यालगतच्या रहिवाशी भागातील घरात घुसून आर्थिक नुकसान होते. त्यामुळे नागरी विकास आराखडा तयार करण्याच्या बाबतीत महत्वाचे पाउल म्हणून नागरी क्षेत्रातील आपत्ती व्यवस्थापना संदर्भात, आर्थिक पायाभूत व एकात्मिक दृष्टीकोन विकसित करण्याची आवश्यकता आहे.

## 2) प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राची कार्यपद्धती:

वर नमूद परिस्थितीत राज्यातील प्रमुख शहरामध्ये प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करणेकरिता महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्र. डी.एम.यू. 2006/सीआर-11/डी.एम-1 दि. 25 जुलै 2006 अन्वये राज्यातील सोलापूर शहरामध्ये प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करणेबाबत शासन निर्णय पारित करण्यात आलेले आहे.

**शहर आपत्ती समितीची रचना**: त्या-त्या शहराचे महापालिका आयुक्त हे शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या प्रमुखपदी राहतील. आपत्ती व्यवस्थापन समिती / समितीच्या अन्य सदस्यांमध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी, शोध व बचावकार्य प्रमुख, प्रशासकीय प्रमुख, मुख्य अभियंता / शहर अभियंता, मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश राहील. याशिवाय महानगरपालिका आयुक्त यांना आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांना सदर समितीवर सदस्य म्हणून घेता येईल. राज्य पातळीवर सचिव (मदत व पुनर्वसन), प्रधानसचिव, नगर विकास विभाग -2, राज्य अग्निशमन सल्लागार आणि संचालक आपत्ती व्यवस्थापन यांचा समावेश असेलेली समिती आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या कामाचे सनियंत्रण करिता आढावा घेईल. ही समिती शहराच्या संबंधित गतिविधींची सनियंत्रण करील व आढावा घेईल.

**शहरासाठी आणि पालिका क्षेत्रांसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करणे**: प्रत्येक शहरांसाठी दोन भागात आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात यावा. पहिल्या भागामध्ये शहराचे जोखीम व आपत्ती प्रवणशील भागांची माहिती तसेच प्रतिसाद योजनेचा समावेश राहील. दुसऱ्या भागात शहरामध्ये उपलब्ध असलेले आपत्ती व्यवस्थापन विषयक साधनसामुग्री व मनुष्यबळाची सखोल माहिती उपलब्ध राहील, जेणेकरुन आपत्तीच्या वेळी त्यांचा उपयोग करून घेता येईल.

आपत्तीची घटना व प्रतिसाद यामधील वेळेचे अंतर कमी करण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेली वरील साधनसामुग्रीची माहिती नजीकच्या काळात वेबसाईटवरसुद्धा उपलब्ध करण्यात येईल. जेणेकरुन साधनसामुग्री बचाव व मदत कार्यासाठी त्वरित उपयोगात आणता येईल.

शहरी आपत्ती व्यवस्थापन आराखड्याच्या धर्तीवर प्रत्येक महापालिका वॉर्डासाठीसुद्धा प्रतिसाद आराखडा तयार करणेत येईल. तसेच संबंधित विभागांना व इतर अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**प्रस्तुत शासनाच्या निर्णयास अनुसरून ठोस नियोजन व उपाययोजना करणेकरिता शहर प्राधिकरण (Urban Authority) म्हणून दोन आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करणेत आले आहेत;**

1) शहर आपत्ती व्यवस्थापन मुख्य समिती
2) शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समिती

## 3) शहर आपत्ती व्यवस्थापन समितीची रचना

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 26 व कलम 30 अंर्तगत प्राप्त अधिकारास अनुसरुन प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे प्रमुख म्हणून मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांची आपत्ती निवारण करणेसाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच केंद्रशासनाचे विधी व न्याय मंत्रालय यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील दि 29 मार्च 2025 च्या (Amendment) दुरुस्तीमधील कलम 41A नुसार शहर प्राधिकरण (Urban Authority) स्थापित करून मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना अध्यक्ष म्हणून नियुक्ती करणात आले असून सोलापूर शहराचा शहरी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. तसेच प्रस्तुत (Amendment) दुरुस्तीस अनुसरुन सोलापूर महानगरपालिकेने आदेश क्र. 529; दि. 19/09/2025 अन्वये **आपत्ती व्यवस्थापन मुख्य समिती** गठीत करण्यात आले, त्याचे सदस्य खालीलप्रमाणे;

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पद | समितीतील पंदनाम |
|---|---|---|
| 1. | मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | अध्यक्ष |
| 2. | मा. जिल्हाधिकारी, सोलापूर जिल्हा | उपाध्यक्ष |
| 3 | मा. अतिरिक्त आयुक्त-2, सो.म.पा. | सदस्य |
| 4 | मा. उपायुक्त-3 (कर आकारणी व भुमी व मालमत्ता), सो.म.पा. | सदस्य |
| 5 | उपसंचालक नगर रचना, सो.म.पा. | सदस्य |
| 6 | प्र. सार्व. आरोग्य अभियंता, सो.म.पा. | सदस्य |
| 7 | नियंत्रण अधिकारी, अतिक्रमण विभाग, सो.म.पा. | सदस्य |
| 8 | आरोग्य अधिकारी, सो.म.पा. | सदस्य |
| 9 | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी, सो.म.पा. | सदस्य |
| 10 | संगणक प्रमुख, सो.म.पा. | सदस्य |
| 11 | विधी अधिकारी, सो.म.पा. | सदस्य |
| 12 | विभागीय अधिकारी, सो.म.पा. (क्षेत्रनिहाय आवश्यकतेप्रमाणे) | सदस्य |
| 13 | प्र. नगर अभियंता, सो.म.पा. | सदस्य सचिव |

सदरील अध्यादेशामधील नमूद कार्यपद्धतीनुसार प्रस्तुत मुख्य समितीद्वारे आपत्ती व्यवस्थापना संबंधित धोरणात्मक निर्णय व नियंत्रण बाबीवर कार्यवाही ठेवणेत येईल. शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीद्वारे प्रस्तावित विविध उपाय योजनाबाबत अंतिम मंजुरी देणे, शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीच्या कार्यपद्धतीवर नियंत्रण ठेवणे इ. नैसर्गिक आपत्ती निवारण करणे, भविष्यातील आपत्ती टाळण्यासाठी शहराचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे, इ. आपत्ती संबंधित बाबी हाताळण्यात येतील.

## आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतुदीनुसार प्रादेशिक शहर आपत्ती व्यवस्थापन मुख्य समितीचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे:

### कलम क्र. 26 : शहर प्राधिकरणाच्या अध्यक्षांचे अधिकार

**(1)** शहर प्राधिकरणाचे अध्यक्ष, शहर प्राधिकरणाच्या बैठकोचे अध्यक्ष, **(पद राबविण्या व्यतिरिक्त शहर प्राधिकरण त्याला पोलीस करील त्याप्रमाणे सोपविण्यांत आलेले अधिकाराचा वापर करील आणि कामे पार पाडील,**

(2) **शहर प्राधिकरणाच्या अध्यक्षास निकडीच्या प्रसंगी जिल्हाधिका-यांचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार अधिकारांचा वापर** शहर प्राधिकरणाच्या कार्यात्तर अनुमती देण्याच्या समर्थनार्थ वापरण्याचा अधिकार असेल तो असे अधिकार वापरील.

(3) शहर प्राधिकरणाला किंवा शहर प्राधिकरणाच्या अध्यक्षास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे पोट कलम (1) किंवा (2) अन्वये सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लेखी स्वरुपात प्राधिकरणाने किंवा त्याचे असे अधिकार व कार्ये यथास्थिती प्राधिकरणाला किंवा त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा शर्तीच्या व मर्यादांच्या अधीन राहून कोणत्याही असल्यास, मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे सोपविता येतील.

### कलम क्र. 27 : बैठका घेणे

**शहर प्राधिकरण आवश्यक असेल तेव्हा व त्यावेळी आणि अध्यक्षाला योग्य वाटेल अशावेळी आणि अशा ठिकाणी बैठक घेईल.**

### कलम क्र. 28 : सल्लागार समित्या आणि इतर समित्या गठित करणे :-

1) शहर प्राधिकरणास त्याला आवश्यक वाटेल तेव्हा व त्यावेळी एक किंवा जास्त सल्लागार समित्या व इतर समित्या गठित करता येतील.

2) शहर प्राधिकरण आपल्या सदस्यांमधून पोट कलम (1) मध्ये निर्दिष्ट केलेल्या समितीचा अध्यक्ष नियुक्त करील.

3) पोटकलम (1) अन्वये गठित केलेल्या कोणत्याही समितीमध्ये किंवा उपसमितीमध्ये तज्ञ म्हणून सहभागी झालेल्या कोणत्याही व्यक्तीला राज्य शासनाकडून विहीत भत्ते देण्यांत येतील.

### कलम क्र. 29 : शहर प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करणे :-

राज्य शासन शहर प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे अधिकारी, समंत्रक आणि इतर कर्मचारी शहर प्राधिकरणाला पुरवील.

### कलम क्र. 30 : शहर प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये

(1) शहर प्राधिकारण आपत्ती व्यवस्थापनासाठी शहर नियोजन समन्वयन व अंमलबजावणी करणारी संस्था म्हणून काम करील आणि राष्ट्रीय प्राधिकरण व राज्य प्राधिकरण यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शकतत्वांनुसार जिल्हयातील आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना हाती घेईल.

(2) पोट कलम (1) च्या तरतुदीनुसार सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता शहर प्राधिकरणाला

(एक) शहरासाठी आपत्ती व्यवस्थापन योजना तसेच शहर कृति योजना तयार करता येईल.

(दोन) राष्ट्रीय धोरण, राज्य धोरण, राष्ट्रीय योजना, राज्य योजना, जिल्हा योजना आणि शहर योजना यांच्या अंमलबजावणीवर व संनियंत्रण ठेवता येईल.

**(तीन) शहर स्तरावरील शासकीय विभागांनी तसेच स्थानिक प्राधिरणांनी शहरातील आपत्ती प्रवण क्षेत्रे निश्चित केलेली आहेत आणि आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी आणि तिच्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी उपाययोजना हाती घेतलेली आहे याबाबत सुनिश्चिती करता येईल.**

(चार) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी तिच्या परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी त्याकरिता सज्ज राहण्यासाठी व तिला तोंड देण्याकरिता उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रीय प्राधिकरणाने व राज्य प्राधिकरणाने घालून दिलेल्या **मार्गदर्शक तत्वांचे शहर स्तरावरील सर्व शासकीय विभागांकडून आणि जिल्हयातील स्थानिक प्राधिकरणांकडून अनुपालन करण्यात येते याबाबत खात्री करून घेता येईल.**

(पाच) आवश्यक असेल त्यानुसार आपत्तीस प्रतिबंध करणेसाठी किंवा तिची तीव्रता कमी करण्यासाठी अशा प्रकारच्या इतर उपाययोजना हाती घेण्याकरिता **शहर स्तरावरील विविध प्राधिकरणांना व स्थानिक प्राधिकरणांना निदेश देता येतील.**

(सहा) शहर स्तरावरील शासकीय विभागांनी व जिल्हयामधील स्थानिक प्राधिकरणांनी अनुसरावयाच्या आपत्ती प्रतिबंध व्यवस्थापन योजनेसाठी **मार्गदर्शन तत्वे घालून देता येतील.**

(सात) शहर स्तरावर शासकीय विभागाने तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेच्या अमंलबजावणीवर संनियंत्रण ठेवता येईल.

(आठ) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी आणि तिची तीव्रता कमी करण्यासाठी शासकीय विभागांनी त्यांच्या विकास योजनांमध्ये व प्रकल्पामध्ये उपाययोजना एकत्रित करण्याच्या प्रयोजनासाठी शहर स्तरावर अनुसरावयाची मार्गदर्शक तत्वे घालून देता येतील आणि त्यासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य देता येईल.

(नऊ) खंड (आठ) मध्ये निर्देष्ट केलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवता येईल.

(दहा) **शहरातील कोणत्याही आपत्तीला किंवा इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी कार्यक्षमतेच्या स्थितीचा आढावा घेता येईल आणि आवश्यकता असेल त्याप्रमाणे शहर स्तरावरील संबंधित विभागांना किंवा प्राधिकरणांना त्यांच्या सेवेत दर्जावाढ करण्याबाबत निदेश देता येईल.**

(अकरा) **सज्जतेबाबतच्या उपाययोजनांच्या आढावा घेता येईल आणि जेथे आवश्यक असेल तेथे कोणत्याही आपत्तीस किंवा इशारा प्राप्त आपत्तीस कार्यक्षमतेने तोंड देण्याकरीता सज्जतेबाबतच्या उपाययोजना आवश्यक स्तरापर्यंत आणण्यासाठी शहर स्तरावरील संबंधित विभागांना किंवा इतर संबंधित प्राधिकरणांना निदेश देता येईल.**

(बारा) शहरातील विविध स्तरावरील अधिका-यांसाठी कर्मचा-यांयाठी आणि स्वंयप्रेरणेने बचाव करणा-या कार्यकर्त्यांसाठी विशेषीकृत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करता येईल व समन्वयन साधता येईल.

(तेरा) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा स्थानिक प्राधिकरणे, शासकीय व अशासकीय संघटनांच्या सहाय्याने तीव्रता कमी करण्यासाठी लोकांना प्रशिक्षण देता येईल व सजगता कार्यक्रम राबविता येईल.

(चोदा) पूर्व सूचना देण्यासाठी यंत्रणा बसविता येईल तिचे परिक्षण करता येईल व तिची दर्जावाढ करता येईल व जनतेला योग्य ती माहिती प्रसारित करता येईल.

(पंधरा) शहर स्तरावर कृती योजना तयार करता येतील आणि योजनेचा आढावा घेता येईल व ती अद्यायावत ठेवता येईल.

(सोळा) कोणतीही इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीस किंवा आपत्तीस तोंड देण्यासाठी समन्वय साधता येईल.

(सतरा) शहर स्तरावरील शासकीय विभागांनी आणि स्थानिक प्राधिकरणांनी शहर कृती योजनेअनुसार आपल्या योजना तयार केल्याबाबत खात्री करून घेता येईल.

(अठरा) **कोणतीही इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीस किंवा आपत्तीस कार्यक्षमतेने तोंड देण्यासाठी उपाययोजना हाती घेण्याकरिता शहर स्तरावरील संबंधित शासकीय विभागांसाठी किंवा शहराच्या स्थानिक सीमांमधील कोणत्याही इतर प्राधिकरणांसाठी मार्गदर्शन घालून देता येईल किंवा निदेश देता येतील.**

(एकोणीस) आपत्ती व्यवस्थापनासाठी काम करण्या-या शहर स्तरावरील शासकीय विभागांच्या वैधानिक मंडळांच्या आणि जिल्हयातील इतर शासकीय व अशासकीय संघटनांच्या कामकाजाबाबत सल्ला देता येईल, सहाय्य करता येईल आणि त्यामध्ये समन्वय साधता येईल.

(वीस) शहरातील स्थानिक प्राधिकरणांशी सवन्वय साधून शहरातील इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीत करावयाच्या किंवा आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी अथवा आपत्तीची तीव्रता कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना तत्परतेने आणि प्रभावीपणे करण्यात आल्या आहेत याची खात्री करुन घेता येईल आणि त्याकरिता **शहरातील स्थानिक प्राधिकरणांना मार्गदर्शक सूचना देता येईल.**

(एकवीस) जिल्हयातील स्थानिक प्राधिकरणांना त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ते तंत्रविषयक सहाय्य पुरवता येईल अथवा सल्ला देता येईल.

(बावीस) शासकीय विभाग, वैधानिक प्राधिकरणे, स्थानिक प्राधिकरणे यांनी शहर स्तरावर तयार केलेल्या विकास योजनांचा आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिची तीव्रता कमी करण्यासाठी त्यात आवश्यक त्या तरतुदी करण्याच्या उद्येशाने आढावा घेता येईल.

(तेवीस) **शहराच्या कोणत्याही भागातील बांधकामाची तपासणी करता येईल आणि आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी अथवा तिची तीव्रता कमी करण्यासाठी अशा बांधकामांना घालून दिलेल्या मानकांचे पालन केले जात नाही किंवा पालन करण्यात आले नाही असे आढळून आल्यास, अशा मानकांचे अनुपालन करण्यासाठी आवश्यक असेल अशी कारवाई करण्याचे संबंधित प्राधिकरणाला निदेश देता येईल.**

(चोबीस) कोणतीही इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीत किंवा आपत्तीच्या वेळी मदत केंद्रे किंवा छावण्या (शिबिरे) म्हणून वापर करता येईल अशा इमारती आणि जागा निश्चित करता येतील आणि अशा इमारतीमध्ये अथवा अशा ठिकाणी पाणीपुरवठयाची व स्वच्छतेची व्सवस्था करता येईल.

(पंचबीस) मदत आणि बचावकार्याच्या साहित्याचा साठा करुन ठेवता येईल किंवा असे साहित्य कमी कालावधीत उपलब्ध देण्याच्या सज्जतेबाबत खात्रीकरुन घेता येईल .

(सव्वीस) आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध पैलुंबिषयी राज्य प्राधिकरणाला माहिती पुरविता येईल.

(सत्तावीस) आपत्ती व्यवस्थापनाकरिता जिल्हयाच्या तळागाळात काम करण्या-या अशासकीय संघटना आणि स्वंयसेवी समाजकल्याण संस्था यांच्या सहभागाबददल प्रोत्साहन देता येईल.

(अठठावीस) दळणवळण व्यवस्था सुस्थितीत आहे आणि आपत्ती व्यवस्थापनाचा सराव ठराविक कालांतराने करुन घेण्यात येत आहे याची सुनिश्चिती करता येईल

(एकोणतीस) राज्यशासन किंवा राज्य प्राधिकरण त्याला नेमून देईल किंवा राज्यातील आपत्ती व्यवस्थापनाकरिता आवश्यक असतील अशी इतर कार्ये पार पाडता येतील.

## 4) शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीची रचना

केंद्रशासनाने दि. 26 डिसेंबर 2005 रोजी पारित केलेल्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा क्र. 53/2005 मध्ये आपत्ती प्रतिसादाची बाब समाविष्ट केलेली आहे. तसेच केंद्रशासनाचे विधी व न्याय मंत्रालय यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील दि 29 मार्च 2025 च्या (Amendment) दुरुस्तीस अनुसरुन सोलापूर महानगरपालिकेने आदेश 529; दि. 19/09/2025 अन्वये **आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समिती** गठीत करण्यात आले, त्याचे सदस्य खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पद | समितीतील पंदनाम |
|---|---|---|
| 1 | मा. अतिरिक्त आयुक्त-2, सो.म.पा. | अध्यक्ष |
| 2 | मा. उपायुक्त-3 (कर आकारणी व भुमी व मालमत्ता), सो.म.पा. | उपाध्यक्ष |
| 3 | उपसंचालक नगर रचना, सो.म.पा. | सदस्य |
| 4 | प्र. सार्व. आरोग्य अभियंता, सो.म.पा. | सदस्य |
| 5 | नियंत्रण अधिकारी, अतिक्रमण विभाग, सो.म.पा. | सदस्य |
| 6 | आरोग्य अधिकारी, सो.म.पा. | सदस्य |
| 7 | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी, सो.म.पा. | सदस्य |
| 8 | संगणक प्रमुख, सो.म.पा. | सदस्य |
| 9 | विधी अधिकारी, सो.म.पा. | सदस्य |
| 10 | विभागीय अधिकारी, सो.म.पा. (क्षेत्रनिहाय आवश्यकतेप्रमाणे) | सदस्य |
| 11 | विभागीय कार्यालयाचे नियंत्रण अधिकारी, सो.म.पा. (क्षेत्रनिहाय आवश्यकतेप्रमाणे) | सदस्य |
| 12 | प्र. नगर अभियंता, सो.म.पा. | सदस्य सचिव |

केंद्रशासनाचे विधी व न्याय मंत्रालय यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील दि 29 मार्च 2025 च्या (Amendment) दुरुस्ती अध्यादेशामधील नमूद कार्यपद्धतीनुसार प्रस्तुत समितीद्वारे आपत्ती व्यवस्थापना संबंधित विविध बाबीवर कार्यवाही ठेवणेत येईल. जसे कि, मुलत:

1) कलम 41A/4 नुसार शहरी पर्जन्य जल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन संदर्भात एकत्रित शहरी पर्जन्य जल / पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे व शहर आपत्ती व्यवस्थापन मुख्य समितीकडे अंतिम मंजुरीकरिता सादर करणे,

2) कलम 41A/5 मंजूर एकत्रित शहरी पर्जन्य जल / पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखड्यानुसार प्रत्यक्ष अमलबजावणी यंत्रणा निर्माण करणे व सदरील कायर्वाहीवर नियंत्रण ठेवणे

3) कलम 25 अन्वये पर्जन्य जल / पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन करिता पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथक स्थापना करणे, पूर नियंत्रण पूर्व परिस्थिती हाताळणेकरिता प्रत्यक्ष जागेवर सर्व्हेक्षण करुन कृती आराखडा तयार करणे व संबंधित कामांकरिता लागणाऱ्या रेखांकन, अंदाजपत्रके, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्याकरिता निधी उपलब्ध होणेकरिता कार्यवाही करणे.

4) उद्भवलेल्या आपत्ती हाताळणेकरिता आपत्ती प्रतिसाद पथक (Disaster Response Force) तयार करून त्याची आदर्श कार्यपद्धती (SOP) तयार करणे व आपत्ती वेळी सदरील यंत्रणा कार्यक्षमरित्या कार्यन्वित करणे.

5) कलम 28 अन्वये आपत्तीजनक परिस्थितीत संभावित नुकसान कमी करणेकरिता लागणाऱ्या उपाययोजना (Meeting Disaster Mitigation Needs) बाबत कृती आराखडा तयार करणे व त्यानुसार आदर्श कार्यपद्धती (SOP) तयार करणे व आपत्ती वेळी सदरील यंत्रणा कार्यक्षमरित्या कार्यन्वित करणे.

6) पूरपरिस्थिती नंतरची परिस्थिती हाताळणेकरिता कृती आराखडा तयार करणे व त्यानुसार आदर्श कार्यपद्धती (SOP) तयार करणे व आपत्ती वेळी सदरील यंत्रणा कार्यक्षमरित्या कार्यन्वित करणे.

7) कलम 56 अन्वये सदरील पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन कार्यपद्धतीमध्ये एखादा अधिकारी, कर्मचारी, सर्व्हेक्षण पथक इ. सदरील आपत्ती व्यवस्थापनामध्ये सक्षमरित्या कामे करीत नसल्यास अथवा काम करणेस नकार देत असल्यास त्यावर शिस्तभंगाची दंडात्मक कारवाई करणेबाबत योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करणे.

## आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतुदीनुसार प्रादेशिक शहर आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे:

### कलम क्र. 31 : शहर योजना

(1) राज्यातील प्रत्येक जिल्हा व शहराकरिता एक आपत्ती व्यवस्थापन योजना असेल.

(2) ही जिल्हा, शहर योजना, शहर प्राधिकरणाकडून स्थानिक प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर आणि राष्ट्रीय योजना तसेच राज्य योजना लक्षात घेऊन तयार करण्यात येईल आणि राज्य प्राधिकरणाची मान्यता घेण्यात येईल.

(3) या जिल्हा, शहर योजनेमध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव असेल

(क) शहरातील आपत्तीच्या वेगवेगळया प्रकारचे आपत्तीप्रवण क्षेत्र;

(ख) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी आणि तिची तीव्रता कमी करण्यासाठी शासकीय विभागांव्दारे आणि शहरातील स्थानिक प्राधिकरणांव्दारे शहर पातळीवर करावयाच्या उपाययोजना;

(ग) कोणत्याही इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीस किंवा आपत्तीस तांड देण्यासाठी शहर स्तरावर शासकीय विभागांव्दारे आणि शहरातील स्थानिक प्राधिकरणांव्दारे हाती घेणे आवश्यक असलेल्या क्षमता वाढीसाठी आणि सज्जतेसाठी उपाययोजना;

(घ) आपत्तीच्या वेळी -

(एक) शहर स्तरावर शासकीय विभाग आणि शहरातील स्थानिक प्राधिकरणे यांना जबाबदारी वाटून देण्यासाठी;

(दोन) आपत्तीस तत्परतेने तोंड देण्यासाठी आणि त्याच्या बचावकार्यासाठी;

(तीन) अत्यावश्यक साधनसामुग्री मिळविण्यासाठी;

(चार) संलग्न संदेशवहन यंत्रणा स्थापन करण्यासाठी; आणि

(पाच) लोकांना माहिती प्रसारित करण्यासाठी, योजना आणि कार्यपध्दती:

(ङ) राज्य प्राधिकरणाला आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही बाब.

(4) शहर प्राधिकरण योजनेचा दरवर्षी आढावा घेण्यात येईल आणि ती अद्ययावत करण्यात येईल.

(5) पोटकलमे (2) आणि (4) मध्ये निदिष्ट केलेल्या शहर योजनेच्या प्रती, शहरातील शासकीय विभागांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

(6) शहर प्राधिकरण, शहर योजनेची एक प्रत राज्य प्राधिकरणाकडे पाठवील आणि राज्य प्राधिकरण ती, राज्य शासनाकडे अग्रेषित करील.

(7) शहर प्राधिकरण योजनेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेईल आणि शहरातील शासनाच्या वेगवेगळया विभागांना योजनेच्या अंमलबजावणीसाठी त्याला आवश्यक वाटतील अशा सूचना देईल.

### कलम क्र. 32 : शहर स्तरावरील वेगवेगळ्या प्राधिकरणाच्या योजना आणि त्यांची अंमलबजावणी-

**भारत सरकारचे आणि राज्य शासनांचे शहर स्तरावरील प्रत्येक कार्यालय आणि स्थनिक प्राधिकरणे, शहर प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणास अधीन राहून -**

(क) पुढील बाबींची व्यवस्था करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करील (एक) शहर योजनेत तरतूद केल्यनूसार आणि संबंधित विभाग किंवा अभिकरण यांना नेमून दिल्यानूसार आपत्तीस प्रतिबंध करण्याच्या आणि तिची तीव्रता कमी करण्याच्या उपाययोजनांकरिता तरतूद करणे.

(दोन) शहर योजनेत नमूद केल्यानुसार क्षमता वाढविण्याशी आणि सज्जतेशी संबंधित उपाययोजना करण्यासाठी तरतूद करणे.

(तीन) कोणत्याही इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीत किंवा आपत्तीच्या वेळी कृति योजना आणि कार्यपध्दती

(ख) आपली योजना आखताना आणि अंमलबजावणी करताना स्थानिक प्राधिकरण, सामाजिक संघटना आणि इतर हितसंबंधित व्यक्तीसह इतर शहर स्तरावरील संघटनाशी समन्वय साधणे.

(ग) योजनेचा नियतकालिक आढावा घेणे आणि तीअ द्ययावत करणे, आणि

(घ) आपल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेची प्रत त्यातील कोणत्याही सुधारणेसह शहर प्राधिकरणास सादर करणे.

**<u>कलम क्र. 33 : शहर प्राधिकरणाने मागणी करणे</u>**

शहर प्राधिकणास आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी तिची तीव्रता कमी करण्यासाठी अथवा तिला कार्यक्षमतेचे तोंड देण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता त्याला आवश्यक असतील अशा शहर स्तरावरील किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिका-याची किंवा विभागाची आदेशाव्दारे मागणी करता येईल आणि असा अधिकरण अथवा विभाग यांना असा आदेश पाठवणे बंधनकारक असेल.

**<u>कलम क्र. 34 : कोणत्याही इशाराप्राप्त आपत्तीच्या किंवा आपत्तीच्या प्रसंगी शहर प्राधिकरणाचे अधिकार आणि कार्ये -</u>**

कोणत्याही इशाराप्राप्त आपत्तीच्या परिस्थितीला किंवा आपत्तीस तोंड देताना सहाय्य करण्याच्या त्यांना संरक्षण देण्याच्या बचाव करण्याच्या प्रयोजनार्थ

**<u>शहर प्राधिकरणास-</u>**

**(क) शासनाच्या कोणत्याही विभागाकडे आणि शहरातील स्थानिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेले साधनसंपत्ती देण्यासाठी आणि तिचा वापर करण्यासाठी निदेश देता येतील.**

**(ख) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्राकडे आणि क्षेत्राकडून व क्षेत्रामध्ये होणा-या वाहनाच्या वाहीतुकीवर नियंत्रण ठेवता येईल आणि त्याला निर्बंध घालता येतील.**

(ग) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्ती प्रवेशावर तेथील हालचालीवर व तेथून निघण्यावर नियंत्रण ठेवता येईल व निर्बंध घालता येतील.

(घ) ढिगारे उपसता येतील, शोध मोहीम राबविता येईल, बचाव कार्य पार पाडता येईल

(ङ) निवारा, अन्न, पिण्याचे पाणी आणि आवश्यक अन्नसामग्री, आरोग्याविषयक देखभाल आणि सेवा पुरविता येतील

(च) बाधित क्षेत्रामध्ये आपत्कालीन यंत्रणांची स्थापना करता येतील

(छ) बेवारशी प्रेताची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करता येईल

(ज) राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा शहर स्तरावरील शासनाच्या अधिपत्याखालील कोणत्याही प्राधिकरणाला किंवा मंडळाला त्याच्या मते आवश्यक असतील अशा उपाययोजना हाती घेण्यासाठी शिफारस करता येईल

(झ) तज्ञ व सल्लागार यांना त्यास आवश्यक वाटेल असा सल्ला देण्यासाठी आणि सहाय्य देण्यास संबंधित क्षेत्रांमधील तज्ञ व सल्लागार यांना फर्माविता येईल

**(ञ) कोणत्याही प्राधिकरणाकडून किंवा व्यक्तीकडून सोयीसुविधा वापरण्याचा विशेष किंवा खास अधिकार प्राप्त करता येईल**

(ट) तात्पुरते पूल बांधणे किंवा इतर आवश्यक ती बांधकामे करणे आणि लोंकासाठी धोकादायक असतील किंवा आपत्तीचे परिणाम अधिक गंभीर होतील अशी बांधकामे पाडून टाकता येतील

(ठ) अशासकीय संघटना आपले कार्य समन्वय रीतीने व कोणताही भेदभाव न करता करीत आहे याची सुनिश्चिती करता येईल

**(ड) अशा परिस्थितीमध्ये आवश्यक वाटतील अशा व इतर उपाययोजना करणे किंवा त्या करण्याची हमी देता येईल.**

**आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतुदीनुसार दिलेल्या अधिकारान्वये अडथळे निर्माण करणाऱ्या नागरीकांविरुद्ध महाराष्ट्र आपत्कालीन व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील खालील नियमान्वये कार्यवाही ठेवणेत येईल.**

**कलम क्र. 51 : अपराध व शास्ती अडथळा इत्यादी आणण्याबद्दल शिक्षा**

जो कोणी वाजवी कारणाशिवाय-

(क) केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांला किंवा कर्मचाऱ्याला अथवा राष्ट्रीय प्राधिकरणाने, राज्य प्राधिकरणाने किंवा जिल्हा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीला या अधिनियमान्वये त्यांची कार्ये पार पाडण्यात अडथळा आणील किंवा

(ख) केंद्र सरकार किंवा राज्य शासन अथवा राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा कार्यकारी समिती यांनी अथवा त्यांच्या वतीने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यास नकार देईल, - तो दोष सिध्द झाल्यावर, एक वर्षापर्यंत वाढता येईल इतक्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल आणि जर अडथळा आणल्यामुळे अथवा निदेशांचे अनुपालन करण्यास नकार दिल्यामुळे जिवितहानी झाली किंवा त्यामुळे जिवितास निकटवर्ती धोका निर्माण झाला असेल तर तो दोष सिध्द झाल्यावर, दोन वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**कलम क्र. 52 : खोट्या दाव्याबद्दल शिक्षा**

जो कोणी, केंद्र सरकार, राज्य शासन, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण यांच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून आपत्तीच्या परिणामी मिळणारे कोणतेही सहाय्य, मदत करण्यात येणारी दुरुस्ती, पुनर्रचना अथवा अन्य लाभ मिळविण्यासाठी हेतूपुरस्सर असा दावा करील की, जो खोटा असल्याचे त्यास माहित असेल वा तसे समजण्यास कारण असेल तर तो दोष सिध्द झाल्यावर, दोन वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडासदेखील पात्र ठरेल.

**कलम क्र. 57 : अधिग्रहणाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत**

**जर कोणत्याही व्यक्तीने कलम 65 अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केले तर, ती व्यक्ती एक वर्षापर्यंत अस् शकेल इतक्या मुदतीच्या करावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्य दंडास किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र असेल.**

**कलम क्र. 58 : कंपन्यांनी केलेला अपराध**

(1) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने किंवा निगम निकाराने केला असेल त्याबाबतीत, अपराध केला त्या वेळी, कंपनीचे कामकाज चालविण्याकरिता जी व्यक्ती, कंपनीची प्रभारी होती किंवा त्यास जबाबदार होतीअशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी अशा उल्लंघनासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तिच्या विरुद्ध खटला दाखल करण्यास शिक्षेस पात्र असेल.

परंतु असे की, जर त्या व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्व प्रकारची दक्षता घेतली होती हे सिद्ध केले तर या पोटकलमातील कोणतीही गोष्ट या अधिनियमामध्ये तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस अशा कोणत्याही व्यक्तीस पात्र ठरविणार नाही.

(2) पोटकलम (1) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल आणि असा अपराध कोणत्याही संचालकाच्या व्यवस्थापकाच्या सचिवांच्या किंवा कंपनीच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमत्तीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्यांच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे घडून आला असल्याचे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यांच्याविरुद्ध खटला भरण्यास शिक्षेस पात्र असेल.

स्पष्टीकरण -- या कलमाच्या प्रयोजनार्थ

(क) ""पनी" याचा अर्थ, कोणतेही निगम निकाय असा आहे आणि त्यात भागीदारी संस्थेचा किंवा अन्य व्यक्ती संघाचा समावेश होतो आणि

(ख) भागीदारी संस्थेचा संबंधात "संचाल" याचा अर्थ भागीदारी संस्थेतील एखादा भागीदार असा आहे.

**कलम क्र. 65 : बचाव इत्यादी कार्यासाठी साधने, तरतुदी, वाहने इत्यादींचे अधिग्रहण करण्याचे अधिकार**

**(1)** जर राष्ट्रीय कार्यकारी समितीस, राज्य कार्यकारी समितीस किंवा **जिल्हा प्राधिकरणास किंवा यांचेकडून प्राधिकृत केलेले अधिकाऱ्याद्वारे-**

(क) त्वरित प्रतिसाद मिळण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा व्यक्तीच्या कोणत्याही **साधनांची गरज** आहे;

(ख) बचाव कार्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही **जागेची गरज** आहे किंवा भासू शकेल; किंवा

**(ग)** आपत्तीग्रस्त क्षेत्रांतून साधने वाहून आणण्याच्या किंवा आपत्तीग्रस्त क्षेत्रात साधने घेऊन जाण्याच्या किंवा मदत, पुनर्वसन किंवा पुनर्बाधकाम या संबंधात वाहतूक करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही वाहनाची गरज आहे किंवा गरज भासू शकेल, राज्य कार्यकारी समितीस किंवा जिल्हा प्राधिकरणास किंवा, याबाबतीत तिने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही यथास्थिति अधिकाऱ्यास दिसून आले असेल तर, असे प्राधिकरण, **लिखीत आदेशाद्वारे अशी साधने किंवा जागा किंवा यथास्थिति अशी वाहने अधिग्रहीत करु शकेल आणि अधिग्रहण करण्याच्या संबंधात त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल असे आणखी आदेश देऊ शकेल.**

(2) जेव्हा केव्हा, पोट-कलम (1) अन्वये कोणतीही साधने, जागा किंवा वाहने अधिग्रहीत करण्यात आली असतील तेव्हा असा अधिग्रहणाचा कालावधी त्या पोटकलमामध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी ज्या कालावधीकरिता अशी साधने, जागा किंवा वाहने आवश्यक असतील, अशा कालावधीच्या बाहेर वाढविता येणार नाही.

(3) या कलमामध्ये -

**(क) "साधनं" या संज्ञेत, पुरुष आणि भौतिक साधनांचा समावेश होतोः**

**(ख) "सेवा" या संज्ञेत, सोईसविधांचा समावेश होतो,**

**(4) "जागा" याचा अर्थ कोणतीही जमीन, इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग, असा आहे आणि त्यात झोपडी, छपरी किंवा इतर संरचना किंवा त्यांचा कोणताही भाग यांचा समावेश होतोः**

**(ग) "वाहन" याचा अर्थ, कोणतेही वापरण्यायोग्य वाहन किंवा परिवहनाच्या प्रयोजनाकरिता वापरता येण्याजोगे असे वाहन - मग ते यांत्रिक शक्ती किंवा अन्य प्रकारे चालविण्यास येत असो, - असा आहे**

## 5) अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होणारी संभाव्य ठिकाणे:


दि. 13 व 14 ऑक्टोबर 2020 रोजी पडलेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील विविध 72 तसेच दि. 10 सप्टेंबर 2025 रोजी पडलेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील विविध 84 ठिकाणी सखल भागात पाणी साठून आपत्ती परिस्थिती उद्भवली होती. त्याची विभागीय कार्यालयनिहाय यादी खालीलप्रमाणे;

| अ. क्र. | विभागीय कार्यालय | दि. 09 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेला बाधित भाग | | दि. 13 व 14 ऑक्टोबर 2020 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेला बाधित भाग |
|---|---|---|---|---|
| | | सखल भाग | रस्ते | |
| 1. | विभागीय कार्यालय क्र. 1 | 1) सुपर मार्केट<br>2) जुनी मिल राहुल नगर बाळे<br>3) वसंत विहार राजे गणपती रस्ता रिध्दी सिध्दी कॉलनी<br>4) पद्मावती नगर, केगांव सव्हिस रोड लगत<br>5) बागले वस्ती, रामजी चौक<br>6) नवी वेस पोलीस चौकी समोर<br>7) हांडे प्लॉट, जुना पुना नाका<br>8) मेकॅनिक चौक परिसर, हॉटेल अजिंठा | 1) वसंत विहार मेंगजी घरासमोर<br>2) गणेश नगर मडकी वस्ती व आर्यनंदी नगर<br>3) सैराट बिर्याणी समोर निराळे वस्ती परीसर<br>4) अभिषेक नगर मुरारजी पेठ शाश्वत हॉस्पीटल समोर<br>5) बाळे सव्हिस रोड लगत राहूल नगर नाल्याच्या शेजारी<br>6) जम्मावस्ती बोळ रस्त्यावर पाणी थांबते.<br>7) श्रीराम नगर शाहीर वस्ती रोड<br>8) काळी मशीद समोर रस्त्यावर पाणी थांबते.<br>9) नवी पेठ, शिंदे चौक परिसरात इंदिरा प्रशाला शेजारी<br>10) आसार मैदान समोरील लोकमंगल बँक समोर | 1) जयमल्हार चौक मातंग वस्ती<br>2) गणेश नगर, मडकी वस्ती<br>3) सम्राट चौक चिडगुपकर हॉस्पिटल समोर<br>4) मेहता टॉवर पाठीमागे मिलिंद नगर<br>5) जुनी पोलीस लाईन मनोहर झोपडपट्टी निराळे वस्तीला जाणारा रोड.<br>6) उमा नगरी 105, 117, अभिषेक नगर भाग-1, भाग -2 हिरज नाका, हजरत खान चाळ, महात्मा फुले झोपडपट्टी<br>7) हांडे प्लॉट, अवंती नगर<br>8) रामलाल चौक ते भैय्या चौक व भैय्या चौक ते वारद चाळ (मिल पेठ नाला) पर्यंत<br>9) जम्मा वस्ती, मुकुंद नगर झोपडपटटी रामजी चौक |
| 2. | विभागीय कार्यालय क्र. 2 | 1) आनंदम विहार पाठीमागे उपहार बेकरी समोर<br>2) शेळगी गावठाण<br>3) साई पार्क,<br>4) गुमठे वस्ती<br>5) हनुमान नगर परीसर | 1) मल्लिकार्जुन नगर भाजी मार्केट<br>2) किसान नगर कोपरा राजू बिअर शॉपी समोर रस्ता<br>3) जवाहर नगर देवी मंदिर कोपरा<br>4) महालक्ष्मी नगर विक्रांत नगर समाधान नगर कॉर्नर रस्त्यापर्यंत<br>5) गोंधळी वस्ती रस्ता<br>6) सग्गम नगर रस्ता<br>7) प्रियंका चौक ते शेळगी ब्रिज<br>8) शेळगी गावठान ते शेळगी ब्रिज<br>9) जुना बोरामणी नाका चौक मस्जिद समोर<br>10) मित्र नगर ऐग्रो मिल जवळ मेनरोड<br>11) जागृत मारुती मंदिर समोरील बाजूस शेळगी ब्रिज जवळ<br>12) राजराजेश्वरी नगर मेनरोड निरमल डेव्हलपर्स समोर<br>13) प्र.क्र.19 गणेश नगर राजगुरु घरासमोर<br>14) पिठ्ठा नगर<br>15) राघवेंद्र नगर कोपरा | 1) माने वस्ती, प्रभाकर महाराज मंदिर, महाबोधी चौक<br>2) शेळगी ब्रिज समोरील जिल्हा परिषद लेडीज हॉस्टेलमागील ठिकाण<br>3) मित्र नगर दहिटणे रोडवरील कुमारस्वामी नगर कोळेकर घराच्या शेजारी असलेला नाला<br>4) आदर्श नगर शेळगी इनामदार घराच्या पाठीमागे मागील नाला<br>5) शेळगी दहिटणे महेश थोबडे नगर शेजारी असलेला नाला<br>6) बसवेश्वर नगर परिसरात शेळगी<br>7) शिवगंगा नगर परिसराचा खालचा भाग शेळगी<br>8) शेळगी तिरंगा चौक परिसर<br>9) जुना विडी घरकुल गोकुळ नगर, विजय ब्राम्हनाथ नगर, पिठ्ठा नगर, चाकोते नगर, योगेश्वर नगर<br>10) संगमेश्वर नगर<br>11) गुरुराज पार्क<br>12) कीर्ती नगर<br>13) तूळशांती नगर |

| अ. क्र. | विभागीय कार्यालय | दि. 09 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेला बाधित भाग | | दि. 13 व 14 ऑक्टोबर 2020 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेला बाधित भाग |
|---|---|---|---|---|
| | | सखल भाग | रस्ते | |
| 3. | विभागीय कार्यालय क्र. 3 | 1) व्यंकटेश नगर<br>2) वज्रेश्वरी नगर<br>3) विश्वकर्मा रेसिडेन्सी निरंजन नगर<br>4) अक्कलकोट रोड एरिया<br>5) नवले नगर<br>6) कल्पना नगर<br>7) माळी नगर<br>8) 256 गाळा<br>9) घोंगडे वस्ती | 1) बनशंकरी हॉटेल ते लोकमंगल हॉस्पीटल<br>2) रुपाभवानी चौक ते विश्रांती चौक<br>3) कर्णिक नगर उद्यान समोरील पावन गणपती समोर<br>4) ERT चौक ते बिडरभट्टी पर्यंत. | 1) नवले वस्ती कल्लपण्णा नगर<br>2) एमआयडीसी, इराबत्ती कारखाना जवळ<br>3) बज्रेश्वरी नगर विनय हॉटेल शेजारी<br>4) होमकर नगर सादुल पेट्रोल पंप जवळ<br>5) विनायक नगर राम मंदीर जवळ<br>6) अक्कलकोट रोड जी.पी. कॉलेज कोपरा (शनी मंदीर)<br>7) वल्ल्याळ मैदान उत्तर वाजुकडील रस्ता<br>8) कणिक नगर चिल्ड्रेन पार्क समोर<br>9) घाँगडे वस्ती 100 सीट संडास लगतचा परिसर<br>10) चडचणकर पेट्रोल पंप शेजारी गणेश पेठ शॉपिंग सेंटर (नाला) |
| 4. | विभागीय कार्यालय क्र. 4 | 1) पाटोल नगर लगशेडटी कारखान्याजवळ,<br>2) शोभादेवी नगर<br>3) शफिक मिस्त्री यांच्या घराजवळ<br>4) भीमाशंकर नगर अश्पाक नट्टोरे यांच्या घराजवळ<br>5) भूदेवी नगर आईस्क्रिम कारखानाजवळ | 1) स्वागत नगर रोड ललिता गृह वस्तू भांडार समोर<br>2) शांती नगर चौक ते बंडगर वाचनालयपर्यंत<br>3) ताई चौक बसवराज किराणा समोर<br>4) गौरी हॉस्पीटल बाजूच्या बोळात स्वागत नगर रोड<br>5) स्वागत नगर रोड धानम्मा टी हाऊस समोर | 1) विजय नगर जमादार बोळात<br>2) शोभादेवी नगर रफिक मिस्त्री बोळात<br>3) निलम नगर लगत दिनदयाल नगर. रविंद्र नगर. ताई चांक, या ठिकाणचे सी.डॉ. वर्क.<br>4) बोळकोट नगर, करली नगर, आरती नगर ओपन नाला<br>5) आडम प्लॉट<br>6) टिळक नगर, मजरेवाडी बस स्टॉप रोड<br>7) भाग्यश्री पार्क, होटगी रोड, विमानतळ<br>8) भाग्यश्री पार्क, होटगी रोड, विमानतळ येथील सी.डी. वर्क<br>9) आदर्श नगर, राजेंद्र घोडके घर<br>10) राहूल नगर, शिवशाही कंपाऊंड लगत, होटगी रोड |
| 5. | विभागीय कार्यालय क्र. 5 | 1) जय जलाराम नगर द्वारकाधीश मंदिर<br>2) मीरा नगर मुख्य रस्ता दूध डेअरी<br>3) भाऊजी खानावळ लगत ब्रम्हदेव नगर<br>4) गैबीपीर झोपडपट्टी येथील नाला<br>5) पाटील नगर नाला जवळ<br>6) कल्याण नगर भाग-2 अंतर्गत रस्त्यावर सखल भागात<br>7) ज्ञानेश्वर नगर अंतर्गत रस्त्यावर सखल भागात | 1) द्वारका नगर अंतर्गत बोळात ओम गर्जना चौक जवळ<br>2) स्वामी निवेकानंद नगर भाग-2 अंतर्गत बोळात<br>3) गर्जना चौकात गणपती मंदिर जवळ<br>4) कादरी हॉस्पीटल समोर नई-जिंदगी रोड<br>5) चेतन फौन्ड्री समोर होटगी रोड<br>6) ब्रम्हदेव नगर गैबीपीर उर्दू शाळा जवळ<br>7) आंबेडकर नगर चप्पल दुकान जवळ<br>8) नवोदय नगर बोळात व मुख्य रस्त्यावर<br>9) तात्या पार्क मुख्य रस्त्याला व बोळात<br>10) प्रीसीजन कॉलनी मुख्य रस्त्यावर | 1) कमला नगर, सुशिल नगर, सोना माता नगर<br>2) वंजारा, निर्मिती गणेश मनोरमा नगर, प्रगती, नगर, सदिच्छा नगर<br>3) द्वारकाशिश मंदिर समोरील परिसर, मंत्री चंडक पार्क, विशाल नगर परिसर<br>4) कांचनगंगा नगर<br>5) कल्याण नगर भाग-3,2 व 1<br>6) आर्यचाणक्य नगर<br>7) नवोदय पार्क<br>8) गैबीपीर झोपडपटटी<br>9) अंत्रोळीकर नगर -1<br>10) ब्रम्हदेव नगर<br>11) द्वारका नगर, उध्दव नगर -1 व 2<br>12) चेतन फोड्रो<br>13) चौगुले पार्क, तात्या पार्क, कस्तुरबा नगर, काजल नगर<br>14) शिवगंगा नगर-4 व 5<br>15) पाटील नगर, जय कुमार नगर, राणा, प्रताप नगर परिसर<br>16) ओम गर्जना चौक परिसर स्वामी विवेकानंद नगर -1 |

| अ. क्र. | विभागीय कार्यालय | दि. 09 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेला बाधित भाग | | दि. 13 व 14 ऑक्टोबर 2020 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेला बाधित भाग |
|---|---|---|---|---|
| | | सखल भाग | रस्ते | |
| 6. | विभागीय कार्यालय क्र. 6 | 1) शेटे वस्ती<br>2) धोंडीबा वस्ती<br>3) यतीमखाना<br>4) सलगरवस्ती<br>5) भूषणनगर<br>6) रेवणसिध्देश्वर नगर<br>7) मधुकर उपलब्ध वस्ती<br>8) थोरली इरण्णा वस्ती<br>9) कमला नगर | 1) भैय्या चौक ते मरीआई चोक<br>2) SLB रिक्षा स्टॉप विठ्ठल करबसू जाधव घर ते सुशिल मराठी शाळा<br>3) रेल्वे बोगदा मोदी स्मशानभूमी | 1) गैबीपीर नगर, रामयाडी धोंडीचा वस्ती, पांगुल मळा,<br>2) लिमयेवाडी, भैरु वस्ती<br>3) भुषण नगर<br>4) मोदी आर.यु.बी. बोगदा<br>5) एन.जी.मिल भैय्या चौक<br>6) विद्युत नगर शेटे वस्ती<br>7) हब्बू वस्ती, आवसे वस्ती परिसर<br>8) अभिमानश्री नगर यश नगर भाग-2, मुरारजी पेठ |
| 7. | विभागीय कार्यालय क्र. 7 | निरंक | निरंक | 1) रेल्वे लाईन, स्टेशन रोड, कुमार चौक<br>2) रेल्वे लाईन फॉरेस्ट परिसर<br>3) रेल्वे लाईन फॉरेस्ट, चांदणी चौक |
| 8. | विभागीय कार्यालय क्र. 8 | 1) कूर्बान हुसेन नगर<br>2) शास्त्रो नगर खाणी<br>3) कुचन नगर झोपडपट्टी | 1) कुमठा नाका जामगोंडी शाळेसमोर | 1) गुरुनानक चौक, कुर्बान हुसेन झोपडपट्टी |


पुना नाका नाला








संतोष नगर नाला






पुना नाका नाला






उमा नगरी




योगेश्वर नगर






संगमेश्वर नगर



कमला नगर



## विशाल नगर




## विनायक नगर





## अंत्रोळीकर नगर



## मुकुंद नगर झोपडपट्टी





## वडार गल्ली




## गोकुळ नगर



## मोदी RUB बोगदा



## गैबीपीर झोपडपट्टी




## धोंडीबा वस्ती, पोगुल मळा




### घोंगडे वस्ती लगतचा परिसर




### माने वस्ती









गणेश पेठ शॉपिंग सेंटर













नवले नगर

## 6) पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकरिता वापरलेली कार्यपद्धती:

सोलापूर शहराचे एकूण 178.00 चौरस किलोमीटर क्षेत्राचे गुगल सॅटलाईट इमेज मधील उपलब्ध लेव्हल्स व नाल्यांचे टोटल स्टेशन सर्व्हेक्षणाच्या आधारे उंचवट्याचे भाग ते नाल्यापर्यंतचा सखल भाग याचा विचार करुन वेगवेगळ्या पाणलोट क्षेत्राचे कंटूर प्लान तयार करण्यात आले आहे व सर्व्हेक्षणात आढळलेल्या एकूण 74 नालेनिहाय पाणलोट क्षेत्रात (Catchment Area) विभागणी करण्यात आली आहे. सद्यस्थिती सोलापूर शहरात एकूण 74 नाले अस्तित्वात असून एकूण 6 बेसिनद्वारे विभागले गेले आहेत, त्याचे बेसिननिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे;

| अ. क्र | बेसिन | समाविष्ट नाले | एकूण लांबी (कि.मी.) |
|---|---|---|---|
| 1. | बेसिन क्र. 1 सुनील नगर ते दहीटणे | 10 | 13.02 |
| 2. | बेसिन क्र. 2 शेळगी नाला | 32 | 52.27 |
| 3. | बेसिन क्र. 3 अदिला नदी | 05 | 16.89 |
| 4. | बेसिन क्र. 4 विजापूर रोड ते सोरेगाव तलाव | 04 | 9.22 |
| 5. | बेसिन क्र. 5 होटगी रोड ते मजरेवाडी | 09 | 12.54 |
| 6. | बेसिन क्र. 6 आकाशवाणी केंद्र, नवले नगर ते देसाई सांडपाणी प्रक्रिया केंद्र | 14 | 11.83 |
| | **एकूण** | **74** | **115.77** |

भारतीय हवामान विभाग, पुणे यांचेकडून सन 1991 ते 2020 पर्यंतचे (30 वर्षाचे) सोलापूर शहराचे पर्जन्यमानबाबतची माहिती (Rainfall Data) घेण्यात आली. भारतीय हवामान विभाग, पुणे यांचेकडील पर्जन्यमानबाबतची माहिती (Rainfall Data) नुसार सोलापूर शहरात दि. 05/07/2011 रोजी 141 मि.मी. / प्रतिदिवस इतका उच्चतम पाऊस पडल्याचे निदर्शास आले. तसेच दि. 14 ऑक्टोबर 2020 रोजी 29 मि.मी. / प्रतितास इतका उच्चतम पाऊस पडल्याचे निदर्शास आले. हवामान विभागाकडील महिना, दिवस, ताशी या तिन्ही स्वरुपाच्या माहितीचे (Rainfall Analysis) अवलोकन करुन तसेच स्टॉर्म वॉटर मॅन्युअल (CPHEEO Manual) मधील तरतुदीनुसार पहिल्या टप्प्यातील नाल्याचे संकल्पनात्मक डिझाईन व नकाशे तयार करण्यात आलेले आहे व उर्वरित नाल्यांचे संकल्पना करणे नियोजित आहे. त्याचा तांत्रिकदृष्ट्या अवलोकन करुन त्याकरिता लागणारी तात्पुरती व कायमस्वरुपी उपाय योजना विविध टप्प्यात करणेबाबत नियोजित आहे.

दि. 13 व 14 ऑक्टोबर 2020 रोजी पडलेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील विविध 72 ठिकाणी तसेच दि. 10 सप्टेंबर 2025 रोजी पडलेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील विविध 84 ठिकाणी सखल भागात पाणी साठून आपत्ती परिस्थिती उद्भवली होती. त्याचा तांत्रिकदृष्ट्या अवलोकन करुन त्याकरिता लागणारी तात्पुरती व कायमस्वरुपी उपाययोजना विविध टप्प्यात करणेबाबत नियोजित आहे.

सदरील नाल्यांचे सर्व्हेक्षण करताना नगररचना विभागाच्या सक्षम मार्गदर्शनाखाली विकास योजना कक्षाने उपलब्ध करुन दिलेले टोपोशीट आणि गाव नकाशे मोझॅक (एकत्रित) केले गेले आहेत आणि त्याद्वारे बेस मॅप तयार करण्यात आला आहे. टोपोशीट आणि गाव नकाशांमध्ये नाल्यांची ठिकाणे आढळलेली आहे. तसेच प्रकल्प सल्लागारांनी केलेले टोटल स्टेशन सर्व्हेक्षण व नगररचना विभागाने केलेले ड्रोन व्हिडिओग्राफी याच्या आधारे नाल्याचे सीमांकन नकाशावर दाखवले आहे. तसेच सन 2004, 2011, 2020 व 2024 च्या उपलब्ध गुगल सॅटलाईट इमेजवर नाल्यांचे प्रवाह मार्क करण्यात आलेले आहे. संबंधित झोनमधील नाले दर्शविणारे झोननिहाय नकाशे तयार करण्यात आले असून प्रत्यक्ष साइट पडताळणीसाठी संबंधित झोन अधिकाऱ्यांना सादर केलेला आहेत. विद्यमान नाल्यांचे प्रवाहामधील बदल, अडथळा आणि अतिक्रमणे याबाबत सविस्तर अहवाल संबंधित झोन अधिकारी यांचेकडून प्राप्त होत आहेत आणि त्यानुसार नगररचना विभागाला प्रस्तुत विचलन (Deviation) विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करणेत आले आहे.

## 7) पर्जन्य जल / पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाची स्थापना :

पर्जन्य जल / पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकरिता मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांचेकडील आदेश क्र. 529 (अ); दि. 19/09/2025 अन्वये पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाची स्थापना करणेत आले आहे. सदरील सर्व्हेक्षण पथकामध्ये पदसिद्ध अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

1) विभागीय अधिकारी (विभागीय कार्यालय क्र. 1 ते 8) व त्यांचेकडील तांत्रिक कर्मचारी
2) बांधकाम परवानगी व नगर रचना विभागाकडील अधिकारी व कर्मचारी
3) नगर भूमापन तज्ञ
4) आपत्ती व्यवस्थापन सल्लागार यांचे प्रतिनिधी

शहराच्या एकूण क्षेत्राचे पाणलोट क्षेत्रानिहाय 6 बेसिन व विभागीय कार्यालय व नालेनिहाय नकाशे तयार करणेकरिता नाल्यांचे सर्व्हेक्षण करताना नगररचना विभागाच्या सक्षम मार्गदर्शनाखाली विकास योजना कक्षाने उपलब्ध करुन दिलेले टोपोशीट आणि गाव नकाशे मोझॅक (एकत्रित) केले गेले आहेत आणि त्याद्वारे बेस मॅप तयार करण्यात आला आहे. टोपोशीट आणि गाव नकाशांमध्ये नाल्यांची ठिकाणे आढळलेली आहे. तसेच प्रकल्प सल्लागारांनी केलेले टोटल स्टेशन सर्व्हेक्षण व नगररचना विभागाने केलेले ड्रोन व्हिडिओग्राफी याच्या आधारे नाल्याचे सीमांकन नकाशावर दाखवले आहे. तसेच सन 2004, 2011, 2020 व 2024 च्या उपलब्ध गुगल सॅटलाईट इमेजवर नाल्यांचे प्रवाह मार्क करण्यात आलेले आहेत. संबंधित झोनमधील नाले दर्शविणारे झोननिहाय नकाशे तयार करण्यात आले असून प्रत्यक्ष साइट पडताळणीसाठी संबंधित झोन अधिकाऱ्यांना सादर केलेला आहेत.

त्याकरिता विविध विभागनिहाय पथके तयार करण्यात आले आहेत त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर कामकाज केलेले आहे;

1) नगर रचना विभाग व नगर भूमापन तज्ञ यांनी उपलब्ध करुन दिलेली माहितीनुरुप टोपोशीट, गाव नकाशे, ड्रोन व्हिडिओग्राफी व सन 2004, 2011, 2020 व 2024 च्या उपलब्ध गुगल सॅटलाईट इमेजच्या आधारे एकत्रितरित्या नाल्यांचे प्रवाहाचे मार्किंग उपलब्ध करुन देणेत आलेल्या नकाशावर करणेत आले आहे.

2) सदरील पथकाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन वरील उपलब्ध माहितीच्या आधारे नाल्याचे संरेखन (Alignment) निश्चित करणे व सदरील नाल्याचे नैसर्गिक पाण्याचे प्रवाह पूर्ववत करणे, **पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहासाठी नाले वर्षभर, पूर्णवेळ व निरंतर खुले ठेवणे,** नाल्यावर असलेले अडथळे जसे कि, अनधिकृत इमारती, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, रॅम्प, भराव इ. अतिक्रमणे तसेच अनधिकृतपणे जमीन मालकाच्या सोयीनुसार वळविण्यात आलेले नाले यांचे मोजमाप करुन अंतिम रेखांकन तयार करणे व सदरील माहिती शीटमध्ये भरुन स्वक्षांकित करुन आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीस सादर करणेत आले आहे. आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीच्या शिफारसीनुसार आपत्ती व्यवस्थापन मुख्य समिती अंतिम निर्णय घेऊन पुढील कार्यपद्धती निश्चित केली जाणार आहे.

3) **सदरील नाल्यांचे प्रवाह जास्तीत जास्त नैसर्गिकरित्या खुले ठेवणेकरिता अतिक्रमणे व अडथळे निष्कासित करणेबाबत आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतुदीनुसार अहवाल सादर केलेला आहे.**

**4) काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये जागेवर गजबजलेल्या भागात व नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहास आवश्यक असणारी रुंदी उपलब्ध होत नसलेस त्याची कारणमिमांसासह काही मर्यादित सेक्शनकरिता भूमीगत नाले (पाण्याच्या सरफेस इनलेटसह) प्रस्तावित करुन सदरची बाब विशिष्टरित्या आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समिती यांचेसमोर "विशेष बाब" म्हणून सादरीकरण करणेत आले आहे. त्यासअनुसरुन सदरची कार्यकारी समिती प्रस्तुत बाब आपत्ती व्यवस्थापन मुख्य समितीकडे अंतिम निर्णयासाठी सादर करणेचे आहे.**

5) सदरील नाल्यांचे प्रवाह जास्तीत जास्त **नैसर्गिकरित्या खुले** ठेवणेकरिता करायावयाच्या तात्पुरती व कायमस्वरुपी उपाययोजनांबाबत तांत्रिक अहवाल सादर करणेत आले आहे.

6) विद्यमान नाल्यांचे प्रवाहामधील बदल, अडथळा आणि अतिक्रमणे याबाबत सविस्तर अहवाल संबंधित झोन अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन त्यानुसार नगररचना विभागाला प्रस्तुत विचलन (Deviation) विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करणेत येत आहेत.

## 8) आपत्ती व्यवस्थापन आराखड्याअंतर्गत आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीमार्फत सुचविण्यात आलेल्या तात्पुरती व कायमस्वरुपी उपाययोजना :

1) **तात्पुरत्या स्वरुपात प्रथम नाल्याच्या प्रवाहाकरिता आवश्यक रुंदीनुसार चर मारणे, नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहामध्ये अडथळा ठरणारी झाडे-झुडपे काढणे, नालेसफाई करुन गाळ काढणे, इमारती, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, रॅम्प, भराव इ. अतिक्रमणे निष्कासित करुन पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहासाठी नाले वर्षभर, पूर्णवेळ व निरंतर खुले ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार काही अंशी काम करणेत आले आहे.**

2) रहदारीचा रस्त्यावर पाणी वाहत असल्यास रस्त्याच्या कडेला पुरेसे सेक्शनचे रोड साईड चर खोदणे व बॅरिकेडिंग करणे आवश्यक आहे. त्यानुसार काही अंशी जागेवरील परिस्थितीनुसार काम करणेत आले आहे.

3) सद्यस्थितीत असलेल्या नाल्यांमध्ये अथवा साईडला असलेली गवत, झाडे-झुडपे काढणे, नालेसफाई करणे व प्रवाह मोकळा करणेत आले आहे.

4) अस्तिवात असलेल्या क्रोस ड्रेनमधील गाळ व अडथळे काढण्यात आले आहे.

5) संबंधित क्षेत्रीय कार्यालय, नगर रचना विभाग, बांधकाम परवानगी विभाग, नगर अभियंता विभाग यांचेकडील अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार;

   क) नाल्याच्या प्रवाहास अडथळा ठरत असणारे इमारती, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, रॅम्प, भराव इ. निष्कासित करणेत आले आहे.

   ख) नाल्यावरील अतिक्रमण काढणेत आले आहे.

   ग) ठिकठिकाणी जागा मालकाच्या सोयीनुसार वळविलेले नाले पूर्ववत करणे आवश्यक आहे. त्यापैकी अंशत: काम करणेत आले आहे.

   घ) ठिकठिकाणी जागा मालकाच्या सोयीनुसार बंदिस्त केलेले नाले खुले व पूर्ववत करणे आवश्यक आहे. त्यापैकी अंशत: काम करणेत आले आहे.

   ङ) ठिकठिकाणी जागा मालकाच्या सोयीनुसार अरुंद केलेले नाले पूर्ववत करणे आवश्यक आहे. त्यापैकी अंशत: काम करणेत आले आहे..

6) विभागीय क्षेत्रानिहाय (Zone wise) देण्यात आलेल्या नकाशातील नाल्यांचे साईटवर प्रत्यक्ष पडताळणी करुन संबंधित क्षेत्रीय कार्यालय, नगर रचना विभाग, बांधकाम परवानगी विभाग, नगर अभियंता विभाग यांचेकडील अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार मा. उपसंचालक, नगररचना विभाग, सोमपा ह्यांनी प्रारुप डी.पी. मध्ये नाल्याचे स्थळ निश्चित करताना ड्रोन फोटोग्राफी तसेच विविध वर्षाचे सॅटेलाईट इमेज, टोपो शीट, व्हिलेज मॅप व प्रत्यक्ष जागेवरील सर्व्हेक्षण ह्याचा विचारकरुन संबधित नाल्याची Alignment निश्चित केली आहे. त्यानुसार प्रस्तावित विकास आराखड्यातील तरतुदीनुसार नाल्याचे आरेखन जागेवर निश्चित करणेत आले आहे.

7) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी तांत्रिक मंजुरी दिलेल्या Plan, L-Section, Cross Section नुसार लागणारी नाल्याची प्रस्तावित रुंदी सुनिश्चित करुन त्यानुसार जागेवर अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, रॅम्प, भराव इ. निष्कासित करुन लागणारी रुंदी उपलब्ध करुन देणेत आले आहे.

8) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी तांत्रिक मंजुरी दिलेल्या Plan, L-Section, Cross Section नुसार जागेवर खुल्या नाल्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करून बांधीव नाला तयार करणेचे काम सुरु करणेत आले आहे.

9) शहरातील नाल्यांचे **देखभाल व दुरुस्तीकरिता खुले आर.सी.सी. नाले** बांधणेबाबत शिफारस करणेत आलेले आहे. परंतु काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये जागेवर गजबजलेल्या भागात व नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहास आवश्यक असणारी रुंदी उपलब्ध होत नसलेस त्याची कारणमिमांसासह काही मर्यादित सेक्शनकरिता **भूमीगत नाले (पाण्याच्या सरफेस इनलेटसह)** प्रस्तावित करणेत आले आहे.

10) सद्यस्थितीत आढळलेल्या Water Logging क्षेत्राचा विचार करता लागणाऱ्या अधिकच्या पर्जन्यजलवाहिनी, जोडवाहिनी, Collection Chamber, Peforated Chamber इ. चा सविस्तर नकाशे, अंदाजपत्रके, प्रकल्प अहवाल इ. तयार करुन त्यास मंजुरी व आर्थिक तरतूद बाबत कार्यवाही करणेत आले आहे.

11) प्रस्तावित पर्जन्यजल वाहिनी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अमलबजावणी दरम्यान येणाऱ्या पाणीपुरवठा लाईन, ड्रेनेज लाईन, केबल्स इ. युटीलिटी शिफ्टिंगचे तांत्रिक नकाशे, अंदाजपत्रके, प्रकल्प अहवाल इ. तयार करुन त्यास मंजुरी व आर्थिक तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर करणेत येत आहे..

## 9) प्रस्तावित पर्जन्यजलवाहिनीची लांबी, रुंदी, उंची ठेवण्याची कार्यपद्धती :

1) आपत्ती व्यवस्थापन सल्लागार यांचेमार्फत गरजेनुसार टोटल स्टेशन सर्व्हेक्षण करणे, नालेनिहाय पाणलोट क्षेत्र निश्चित करणे, भारतीय हवामान विभाग यांचेकडून उपलब्ध केलेल्या पर्जन्यमान माहितीचे ताशी उच्चतम व दिवस उच्चतम या परिमाणाचे विचार करुन व स्टॉर्म वॉटर मॅन्युअल (CPHEEO Manual) मधील तरतुदीनुसार सदरील नाल्याचे संकल्पना तयार करणेत आले आहे. उपरोक्त संकल्पनाच्या आधारे ढोबळमानाने अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

2) प्रस्तावित **खुल्या नाल्याचे सेक्शन वर्षभर, पूर्णवेळ व निरंतर खुले ठेवणेकरिता** लागणारी लांबी, रुंदी, उंची प्रस्तावित करणेत आले आहे व जागोजागी लागणाऱ्या क्रॉसिंगकरिता सी.डी. वर्क्स, बॉक्स कलव्हर्ट, स्लॅब कलव्हर्ट, ब्रिज इ. उपाययोजना प्रस्तावित करणेत आले आहे.

3) सोबत नाल्याचे हायड्रॉलिक डिझाइन (Hydraulic Design) चा नमुना (Sample) जोडण्यात आलेले आहे.

# परिशिष्ट अ :
# आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत केल्याचे आदेश

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.
दूरध्वनी मा. आयुक्त (वै) कार्यालय, फोन नं. ०२१७ -७४०३००
(Email ID: smccommissioner@yahoo.com)


जा.क्र./न.आ./वै./५२९.          दिनांक: १९/०९/२०२५

## सुधारित कार्यालयीन आदेश

विषय- सोलापूर महानगरपालिका स्तरावर आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत करणेबाबत..

संदर्भ- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५

२) जा.क्र./नआ/वै/५०६ दिनांक १५/०९/२०२५ रोजीचे आदेश.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार आपत्तीपूर्व तयारी, आपत्ती नियंत्रण, आपत्ती निवारण, मदत व पुनर्वसन ही कार्यवाही पार पाडणे, चालू केलेल्या कार्यवाहीस गती देणे व काम पूर्ण करणे, यामध्ये वेळोवेळी समन्वय साधणे या व अशा संदर्भात मनपास्तरावर आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे सर्वसाधारण नियंत्रणाच्या अधिन राहून आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली असून, अ.क्र.२ नुसार नव्याने उपायुक्त यांच्या नावाचा समावेश करण्यात येत असून पुढीलप्रमाणे समितीची रचना राहील.

समितीची रचना-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पद | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| ०१ | श्री. संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त-२ | अध्यक्ष |
| ०२ | श्री. आशिष् लोकरे, उपायुक्त-३ (कर आकारणी व भुमी व मालमत्ता) | उपाध्यक्ष |
| ०३ | श्री. मनिष भिष्णुरकर, उपसंचालक नगर रचना | सदस्य |
| ०४ | श्री. व्यंकटेश चौबे, प्र.सार्व. आरोग्य अभियंता | सदस्य |
| ०५ | श्री. तपन डंके, नियंत्रण अधिकारी, अतिक्रमण विभाग | सदस्य |
| ०६ | श्रीमती राखी माने, आरोग्य अधिकारी | सदस्या |
| ०७ | श्री. अच्युत दुधाळ, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी | सदस्य |
| ०८ | श्रीमती स्नेहल चपळगावकर, संगणक प्रमुख | सदस्या |
| ०९ | श्रीमती संध्या भाकरे, विधी अधिकारी | सदस्या |
| १० | विभागीय अधिकारी (क्षेत्रनिहाय आवश्यकतेप्रमाणे) | सदस्य |
| ११ | श्रीमती सारिका आकुलवार, प्र.नगर अभियंता | सदस्या सचिव |

*टीप: जरी अधिकाऱ्यामध्ये बदल झाल्यास वरीलप्रमाणे नमुद पदानुसार समिती कार्यरत राहिल.*

उपरोक्तप्रमाणे समितीची रचना राहील. यापूर्वी दिलेल्या निदेशानुसार समितीचे कार्यक्षेत्र व करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात आदेशात नमूदप्रमाणे कार्यवाही समितीच्या माध्यमातून पार पाडावी.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

प्रति,
सर्व नियंत्रण अधिकारी, खाते/विभागप्रमुख
विभागीय अधिकारी
प्रत-जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती.

# परिशिष्ट ब :
# पर्जन्य जल / पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाची स्थापना केल्याचे आदेश

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.**
**दूरध्वनी मा. आयुक्त (वै) कार्यालय, फोन नं. ०२१७ -७४०३००**
**(Email ID: smccommissioner@yahoo.com)**


जा.क्र./न.आ./वै./५२९(अ) दिनांक: १९/०९/२०२५

## -: कार्यालयीन आदेश :-

**विषय : पर्जन्य जल / पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकरिता पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाची स्थापना करणेबाबत.**

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. डी.एम.यू. २००६/सीआर-११/डी.एम-१ दि. २५ जुलै २००६

२) केंद्रशासनाचे विधी व न्याय मंत्रालय यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील दि २९ मार्च २०२५ रोजीचे (Amendment) दुरुस्ती

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार तसेच केंद्रशासनाचे विधी व न्याय मंत्रालय यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील दि २९ मार्च २०२५ च्या (Amendment) दुरुस्तीमधील कलम ४१३ नुसार शहर प्राधिकरण (Urban Authority) स्थापित करून मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांना अध्यक्ष म्हणून नियुक्ती करणात आले असून सोलापूर शहराचा शहरी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. सदरील आदेशास अनुसरून पूर नियंत्रण स क्षण पथकाची स्थापना करणेत आलेले असून स क्षण पथकामध्ये खालीलप्रमाणे पदसिद्ध अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

| अ.क्र. | पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकामधील समाविष्ट अधिकारी व कर्मचारी |
|---|---|
| १ | विभागीय अधिकारी (विभागीय कार्यालय क्र. १ ते ८) |
| २ | कनिष्ठ अभियंता / सहा. अभियंता (विभागीय कार्यालय क्र. १ ते ८ आवश्यकतेनुसार) |
| ३ | उप अभियंता बांधकाम परवानगी विभाग व त्यांचेकडील कनिष्ठ अभियंता / सहा. अभियंता (आवश्यकतेनुसार) |
| ४ | उप अभियंता नगर रचना विभाग व त्यांचेकडील कनिष्ठ अभियंता / सहा. अभियंता (आवश्यकतेनुसार) |
| ५ | एस. बी. तूपदोळकर (नगर भूमापन तज्ञ) |
| ६ | आपत्ती व्यवस्थापन सल्लागार यांचे प्रतिनिधी<br>• जावेद नदाफ व रोहित गोडगे (विभागीय कार्यालय क्र. १ व ८)<br>• रोहन तोगरे व रमेश गंड (विभागीय कार्यालय क्र. २ व ३)<br>• चंद्रकांत गुंडे व आकाश सुरवसे (विभागीय कार्यालय क्र. ४ व ५)<br>• अभिषेक टोणपे व रणजीत काळे (विभागीय कार्यालय क्र. ६ व ७) |

**पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाचे कार्यक्षेत्र :**

१) शहराच्या एकूण क्षेत्राचे पाणलोट क्षेत्रानिहाय ६ बेसिन व विभागीय कार्यालय व नालेनिहाय नकाशे तयार करणेकरिता नाल्यांचे सर्व्हेक्षण करताना नगररचना विभागाच्या सक्षम मार्गदर्शनाखाली विकास योजना कक्षाने उपलब्ध करून दिलेले टोपोशीट आणि गाव नकाशे मोझॅक (एकत्रित) करून त्याद्वारे बेस मॅप तयार करणे.

२) टोपोशीट आणि गाव नकाशांमध्ये नाल्यांची ठिकाणे मार्क करणे.

३) प्रकल्प सल्लागारांनी केलेले टोटल स्टेशन सर्व्हेक्षण व नगररचना विभागाने केलेले ड्रोन व्हिडिओग्राफी याच्या आधारे नाल्याचे सीमांकन नकाशावर दाखविणे.

४) सन २००४, २००१, २०२० व २०२४ च्या उपलब्ध गुगल सॅटेलाईट इमेजवर नाल्यांचे प्रवाह मार्क करणे.

५) नाले दर्शविणारे झोननिहाय नकाशे तयार करून प्रत्यक्ष साइट पडताळणीसाठी संबंधित झोन अधिकाऱ्यांना सादर करणे.

६) नगर रचना विभाग व नगर भूमापन तज्ञ यांनी उपलब्ध करून दिलेली माहितीनुरूप टोपोशीट, गाव नकाशे, ड्रोन व्हिडिओग्राफी व सन २००४, २००१, २०२० व २०२४ च्या उपलब्ध गुगल सॅटेलाईट इमेजच्या आधारे एकत्रितरित्या नाल्यांचे प्रवाहाचे मार्किंग उपलब्ध करून देणेत आलेल्या नकाशावर करणे

७) पथकाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन वरील उपलब्ध माहितीच्या आधारे नाल्याचे संरेखन (Alignment) निश्चित करणे व सदरील नाल्याचे नैसर्गिक पाण्याचे प्रवाह पूर्ववत करणे, **पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहासाठी नाले वर्षभर, पूर्णवेळ व निरंतर खुले ठेवणे,** नाल्यावर असलेले अडथळे जसे कि, अनधिकृत इमारती, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, रॅम्प, भराव इ. अतिक्रमणे तसेच अनधिकृतपणे जमीन मालकाच्या सोयीनुसार वळविण्यात आलेले नाले यांचे मोजमाप करून अंतिम रेखांकन तयार करणे आणि सदरील माहिती शीटमध्ये भरून स्वाक्षांकित करून आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीस सादर करणेत आले आहे.

८) **नाल्यांचे प्रवाह जास्तीत जास्त नैसर्गिकरित्या खुले ठेवणेकरिता अतिक्रमणे व अडथळे निष्कासित करणेबाबत आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदीनुसार अहवाल वेळोवेळी सादर करणे.**

९) **काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये जागेवर गजबजलेल्या भागात व नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहास आवश्यक असणारी रुंदी उपलब्ध होत नसलेस त्याची कारणमिमांसासह काही मर्यादित सेक्शनकरिता भूमीगत नाले (पाण्याच्या सरफेस इनलेटसह) प्रस्तावित करून सदरची बाब विशिष्टरित्या आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समिती यांचेसमोर "विशेष बाब" म्हणून सादरीकरण करणे.**

१०) नाल्यांचे प्रवाह जास्तीत जास्त **नैसर्गिकरित्या खुले** ठेवणेकरिता करायावयाच्या तात्पुरती व कायमस्वरूपी उपाययोजनांबाबत तांत्रिक अहवाल सादर करणे.

११) विद्यमान नाल्यांचे प्रवाहामधील बदल, अडथळा आणि अतिक्रमणे याबाबत सविस्तर अहवाल संबंधित झोन अधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेऊन त्यानुसार नगररचना विभागाला प्रस्तुत विचलन (Deviation) विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करणेबाबत मार्गदर्शन करणे.

<u>पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथकाची कार्यपद्धती:</u>

१) वेळोवेळी आवश्यकतेनुसार पथकाची सामूहिक बैठका घेण्यात येऊन त्याद्वारे कामाचा आढावा घेणे,

२) पथकामध्ये असलेले अधिकारी, कर्मचारी, सल्लागार यांच्या एकत्रित समन्वयाने पुढील करण्यात येणाऱ्या कामांचे नियोजन करणे, कामाचे वेळापत्रक बनविणे.

३) आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत विविध प्रकारची माहिती विहित नमुन्यात भरुन स्वक्षांकित करून आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीस सादर करणे.

<u>अंमलबजावणी:</u>

वरीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेले मनपा स्तरावरील पूर नियंत्रण सर्व्हेक्षण पथक तात्काळ कार्यान्वित करणेत येत आहे. सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी पथकाच्या कार्यवाहीला सहकार्य करून वेळोवेळी माहिती व आवश्यक मदत उपलब्ध करून द्यावी. **प्रस्तुत नाल्यांचे नालानिहाय सर्व्हेक्षण अहवाल** नियोजित वेळेत आपत्ती व्यवस्थापन कार्यकारी समितीस सादर करणे बंधनकारक आहे. यामध्ये टाळाटाळ अथवा दिरंगाई दिसून आल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियमातील तरतुदीसह इतर कायद्यातील लागू असलेल्या तरतुदीनुसार गंभीर स्वरुपाची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

प्रति,

१) विभागीय अधिकारी (विभागीय कार्यालय क्र. १ ते ८)
२) उप अभियंता बांधकाम परवानगी
३) उप अभियंता नगर रचना विभाग
४) एस. बी. तुपदोळकर (नगर भूमापन तज्ञ)
५) आपत्ती व्यवस्थापन सल्लागार यांचे प्रतिनिधी